प्रा. डॉ. कैलास क. बगदाणे



# दिवाळी आणि दीपमाळ, कंदीलपुष्प, भुईचक्र वनस्पती

दिवाळी हा हिंदूंचा एक प्रसिद्ध सण भारतात सर्वत्र साजरा होतो. या सणाचा उगम फार प्राचीनकाळी आर्यांचे वास्तव्य उत्तरध्रुव प्रदेशात होते, त्याकाळातच झाला असे म्हणतात. अश्विन वद्य त्रयोदशीपासून कार्तिक शुद्ध द्वितीयेपर्यंत प्रत्येक तिथीस आनंददायक घटना असल्यामुळे या पाचही दिवस दीपमाळा लावुन हा उत्सव साजरा करतात. काही लोकांची अशी श्रद्धा आहे की, १४ वर्षांचा वनवास संपवून प्रभू रामचंद्र सीतेसह अयोध्येला परत आले ते याच दिवसात. त्यावेळी अयोध्येतल्या प्रजेने दिपोत्सव केला आणि तेव्हापासुन हा उत्सव दरवर्षी सुरु झाला.

हिंदू उत्सवात वनस्पतींना खूप महत्व आहे. विशेषतः दिवाळी सणात अनेक वनस्पतींचा उपयोग केला जातो. दीपमाळ ही एक वनस्पती आहे. तिचे शास्त्रीय नाव असून ती तुळशीच्या कुळातील आहे( ). ही शोभिवंत वनस्पती सुमारे १.२ ते १.८ मी. उंच वाढते. दीपमाळ औषधी असून एका वर्षात (वर्षायू) जीवन क्रम पूर्ण करणारी आहे (पुष्पधारणा आणि फलधारणा). श्रीलंकेत व भारतात उष्ण ठिकाणी सर्वत्र, जंगली अवस्थेत किंवा शेताच्या बांधावर आढळते. तिची पाने मोठी, साधी, सूक्ष्म , लवदार, अंडाकृती, दातेरी, पातळ, लांब देठाची व खोडावर समोर–समोर येतात. मुख्य म्हणजे ज्यापद्धतीने फुलधारणा होते, यावरून संयुक्तिक नाव आहे. शेंदरी, नारिंगी रंगाचे अनेक फुलांचे झुबके सप्टेंबर–ऑक्टोबर महिन्यात येतात. मुख्य खोडावर व फांद्यांवर विशेषतः वरच्या पेऱ्यांवर पानांच्या बगलेत पुंजासारख्या वल्लरीत फुले मंदिरासमोर असणाऱ्या दीपमाळे सारखी दिसतात. पाने, संदलेव फुले यामध्ये कडू द्रव्य, मेदी अम्ल, रेझीन व खनिजद्रव्य असतात. भाजणे, पोळणे यावर फुलांची राख लावतात. दह्यातून ती गजकर्ण, नायटे, चाई यावर लावतात. दीपमाळ शुद्धीकारक,



आर्त व जनक (विटाळ साफ करणारी) ज्वरनाशक आहे.

दिवाळी हा सण दीपावली या नावानेही ओळखला जातो. पावसाळा संपून शरद ऋतू सुरु होत असल्यामुळे या उत्सवाला धार्मिक आणि सामाजिक महत्व आले आहे. यावेळी नवे धान्य तयार झालेले असते, म्हणून हा कृषी विषयक आनंद उत्सव ही आहे. धन त्रयोदशीच्या आदल्या दिवशी गोवत्स द्वादशी असते, यास वसुबारस असेही म्हणतात. या दिवशी सुवासिनी सवत्स गायीची पुजा करतात.

अश्विन वद्य त्रयोदशीला धनत्रयोदशी हे नाव आहे. यमराजाने आपल्या दूतांना यादिवशी जो दीपदान करील, त्याला अपमृत्यु येणार नाही, असे सांगितल्याची कथा आहे. म्हणून या दिवशी मंगल स्नान करून दीप लावतात. यमराजाची दक्षिणेकडे तोंड करून याच दिवशी दिवा लावायचा असतो. (इतरवेळी दक्षिणेकडे तोंड करून दिवा लावणे अशुभ समजतात.) दिवाळीच्या शुभमुहूर्तावर घरासमोर



आकाशकंदील लावतात. पूर्वी खेडोपाडी विजेची उपलब्धता नसल्याने प्रज्वलित दिवा घरगुती पद्धतीने तयार केलेल्या आकाश कंदिलात ठेवत. आता खेड्यात आणि शहरात आकर्षक रंगांचे, विजेवर आधारित आकाश कंदील घराची व परिसराची शोभा वाढवतात.

दिवाळीत ज्याप्रमाणे आकाश–कंदील शोभा वाढवतो त्याच प्रमाणे सृष्टीत दिवाळीच्या कालावधीत कंदील पुष्प वनस्पती पाहायला मिळते. तिचे शास्त्रीय नाव असून तिच्या अनेक प्रजाती असतात. ती वेल वर्गीय/लता आहे. या वनस्पती अत्यंत दुर्मिळ आहेत. वेगवेगळया प्रजातीची फुले वेगवेगळ्या रंगाची असतात. त्यातल्या काही सुगंधी आहेत. त्यांचे परागीभवन छोट्या कीटकांद्वारे होते. कंद जमिनीत असतो. तो बटाट्यासारखा असतो. कंदापासून पुढच्या वर्षी पुन्हा वनस्पती वाढते.

अश्विन वद्य चतुर्दशीस नारक चतुर्थी हे नाव आहे. यादिवशी कृष्णाने नारका सूराचा वध केला व त्याच्या बंदिवासात असलेल्या सोळा हजार स्त्रियांना बंधमुक्त केले. नरकासुराच्या रक्ताचा टिळा लावून कृष्ण सूर्योदयपूर्वीच परत आला. त्यावेळी त्यास मंगल स्नान घालून ओवाळण्यात आले, याची स्मृती म्हणून सूर्योदयपूर्वी स्नान करून दिवे लावतात व आनंद उत्सव साजरा करतात. सत्यभामेने श्रीकृष्णाच्या मदतीने नरकासुराला मारले अशी ही एक कथा आहे, यादिवशी महाराष्ट्रात काही ठिकाणी नरकासुराचा शेणाची आकृती करून पूजन करतात.

यादिवशी सूर्योदयापूर्वी अंगाला तेल लावून उष्णोदकाने स्नान करताना अपामार्ग / आघाडा वनस्पतीने अंगभर प्रोक्षण, स्नानानंतर यमराजाला वंदन व

जलांजली, दुपारी ब्राम्हणभोजन, प्रदोषकाळी दीपदान, शिवपूजा, महाशिवरात्री पूजा आणि नक्तभोजन असा व्रताचा विधी आहे. काही लोक त्यादिवशी पितृ तर्पण करतात.

दिवाळी सणात रात्री भुईचक्रे, भुईनळे इत्यादी प्रकारचे फटाके वाजवून आनंद द्विगुणित करतात. सदर फटाक्यांशी नाम साधर्म्य असलेल्या काही वनस्पती आहेत. भुईचक्र ह्या वनस्पतीचे शास्त्रीय नाव आहे. भारतात. ही प्रजाती आढळते. हे कंद वर्गीय क्षुप आहे. ते वर्षायू म्हणजेच वर्षभरात जीवनक्रम पूर्ण करते. फूल आणि फळधारणेचा काळ जुलै ते सप्टेंबर असतो. एका वनस्पतीला एक ते सहा फुले येतात. फुलातील निदलपुंजाची रचना गोलाकार/चक्राकार असते. तिची उंची केवळ काही सेंटीमीटर असल्याने फुले जमिनी लगत असल्याचे भासते त्यामुळेच भुईचक्र हे नाव असावे. तिला औषधी महत्व आहे.

अश्विन वद्य अमावषेला रात्री लक्ष्मीपूजन असते. लक्ष्मी सौंदर्याचे, प्रेमाचे व वैभवाचे प्रतीक आहे. संयमपूर्वक धनसंपादन केले, तर मनुष्याचे कल्याण होते. यासाठी धनलक्ष्मीची पूजा करतात. ह्यादिवशी अष्टदल कमळावर लक्ष्मीची स्थापना करतात. लवंग, वेलची व साखर घालून केलेल्या खव्याचा नैवद्य दाखवतात. धने, गुळ, साळीच्या लाह्या, बत्तासे इ. पदार्थ लक्ष्मीला वाहून नंतर ते घरातील सर्वांना वाटतात. यारात्री केवळ द्यूत खेळावे, असे सांगितले आहे. द्रव्य हे चंचल आहे, हे लक्षात येण्यासाठी या खेळाची योजना असावी. लक्ष्मी यादिवशी सर्वत्र संचार करत असते. जेथे स्वच्छता, मांगल्य, प्रकाश आढळेल, तेथे ती निवास करते अशी समजूत असल्यामुळे यारात्री दिव्यांची रोषणाई करतात. घरातील कचरा म्हणजे अलक्ष्मी दूर करणारी केरसुणी लक्ष्मी मानून तिची पूजा करतात. (केरसुणी म्हणजेच सिंधी या वनस्पतीपासून तयार केली जाते. )

कार्तिक शुद्ध प्रतिपदेस बलिप्रतिपदा साजरी करतात.



यादिवशी विष्णूने वामन अवतार घेऊन बळीराजाला पाताळात लोटले. यादिवशी दीपदान करील त्याला यमयातना भोगाव्या लागणार नाहीत, असा वामनाने बळीला वर दिला. यादिवशी बलिपूजा करण्याची पद्धत आहे. यादिवसापासून विक्रम संवत सुरु होतो, म्हणून याला दिवाळी पाडवा म्हणतात. हिंदूंच्या साडेतीन मुहूर्तांपैकी हा अर्धा मुहूर्त आहे. यादिवशी पत्नीने पतीला ओवाळण्याची पद्धत आहे. गोवर्धन पूजा करण्याची पद्धतही काही ठिकाणी आहे. हा दिवाळीचा मुख्य दिवस मानतात. कार्तिक शुद्ध द्वितीयेचे भाऊबीज हे नाव आहे. यादिवशी यम आपल्या बहिणीकडे गेला तेव्हा तिने त्याला ओवाळले आणि आनंद व्यक्त केला, तेव्हापासून बहिणीने भावाला ओवाळण्याची चाल रूढ झाली. सर्वांना वनस्पतीजन्य दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

◆

**डॉ. कैलास बगदाणे**
मोबा. ९८५०२७१८६२